स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विभागातील 'इतिहास' या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

~: संशोधनाचा विषय :~

"महात्मा गौतम बुद्धाच्या विचारातील विज्ञानवाद ; संदर्भ आणि भूमिका : एक ऐतिहासिक अभ्यास"

~: संशोधक :~

प्रा. बनसोडे पंढरी सोपानराव

श्री शिवाजी महाविद्यालय, उमरगा जि. उस्मानाबाद

~: मार्गदर्शक :~

प्रा. डॉ. बलखंडे एस. पी.

इतिहास विभाग प्रमुख,

कै. बाबुराव पाटील महाविद्यालय, हिंगोली

२०१६

"महात्मा गौतम बुद्धाच्या विचारातील विज्ञानवाद; संदर्भ आणि भूमिका : एक ऐतिहासिक अभ्यास "

प्रस्तावना :-

भारतामध्ये इ.स. सहाव्या शतकात जैन व बौद्ध धर्माचा उदय झाला. भारतभूमीमध्ये उगम पावलेला व नंतर संबंध आशियात पसरलेला बौद्ध धर्म होता.

इतिहासात अनेक महापुरुष होऊन गेले. यातील गौतम बुद्ध एक होय. महात्मा गौतम बुद्धाच्या अनेक ज्ञात-अज्ञात बाजूवर संशोधन होणे गरजेचे आहे. जगातील पहिला 'विज्ञानवादी पुरुष' म्हणून गौतम बुद्धाकडे पाहिले जाते. एकूण मानव जाति संदर्भात विचार करणारा महान विज्ञानवादी विचारवंत म्हणून इतिहासकार बुद्धाकडे पाहतात.

जीवनाच्या सत्याचा शोध लावणारा महान तपस्वी, संत, महात्मा, तथागत, शाक्य मुनी इत्यादी असे अनेक विशेषणाने संबोधित असणारे गौतम बुद्ध होय. वर्तमानातल्या समस्या व प्रश्नांचा शोध जर घ्यावयाचा असेल तर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाशिवाय आपल्याला पर्याय नाही. मानवाच्या शांतीसाठी, आखिल मानवजातीच्या कल्याणाकरीता आयुष्य खर्च करणारा सर्वोतम भूमिपुत्र बुद्ध होय.

डॉ. बी. आर. आंबेडकर लिहितात कि, "बुद्ध हा या सृष्टीवरील पहिला विज्ञानवादी तत्तज्ञ होय" आज 21 व्या शतकाकडे वाटचाल करत असताना मानव हा संपूर्णतः चंगळवादक्रडे (भौतिकवादाकडे) आकर्षित होत आहे. त्याला वेळीच रोखले नाही. तर मानवाचा विनाश हा अटळ आहे. पर्यायाने बुद्धाच्या धम्म विज्ञानाकडे वाटचाल ही मानवाला करावी लागेल. यात कसलाही संदेह नाही.

गौतम बुद्ध म्हणतात, "ज्यांना जीवनाचे सत्य समजले असा कोणी ही बुद्धत्त्वाकडे जाऊ शकतो."

संशोधनाची आवश्यकता :-

संशोधनाचा मुळ उद्देश जुन्या संकल्पना, जुने विचार व तत्कालिन परिस्थिती यांचा अभ्यास करुन त्यावर पूर्णविचार करुन त्याच्या योग्य अयोग्यतेचा परामर्श घेणे त्यामध्ये होऊन गेलेल्या थोर व्यक्तीच्या कार्य कर्तृत्वाचा आढावा घेऊन त्याची प्रेरणा भावी पिढीला घेता यावी या थोर व्यक्तीनी आतापर्यंत संशाधनातून व मांडणीतून गौतम बुद्धाच्या चरित्राचा अभ्यास करण्यात आला आहे.

तत्त्वज्ञ, विचारवंत, भूमिपुत्र, मार्गदाता, सम्राट, तथागत, शाक्य मुनि, अशा किती तरी भूमिकांतून बुद्धाचे वर्णन संशोधन झाले असले तरी विज्ञानवादी बुद्ध कसे होते ? हेच या संशोधनातून सिद्ध करावयाचे आहे.

आजपर्यंत संशोधकाने गौतम बुद्ध चरित्र धम्म तत्त्वज्ञान इत्यादीचा अभ्यास केला असून विविध प्राथमिक साधने, द्वितीयक साधनांचा अर्थ लावून संशोधन केले आहे. विज्ञानवादी बुद्ध हा अज्ञात असलेला पैलू सर्वासमोर आणण्याचा प्रयत्न या संशोधनाद्वारा मी करणार आहे.

संशोधनाचा उद्देश :-

1) महात्मा गौतम बुद्धाच्या विज्ञानवादी विचारांची उकल करणे.

2) महात्मा गौतम बुद्धाच्या विज्ञानवादी विचारांचे पुर्नविश्लेषण करुन त्यांची पुर्नमांडणी करणे.

3) गौतम बुद्धांच्या विज्ञानवादी विचारांची रचनात्मक मांडणी करुन तथ्याची पुर्नप्रकटीकरण करणे.

4) गौतम बुद्धा संदर्भातील अज्ञात विचारांचे पुर्नरावलोकन करणे.

5) गौतम बुद्धाच्या विज्ञानवादाच्या सहाय्याने वर्तमानातील प्रश्न व समस्यांचे संदर्भ शोधणे.

6) गौतम बुद्ध पृथ्वीतलावरील पहिला विज्ञानवादी विचारवंत होता हे संशोधना अंती सिद्ध करणे.

संशोधनाची गृहितके :-

1) इतिहास हे साधनांच्या दयेवर चालणारे शास्त्र आहे. त्यामुळे मुळ संदर्भ ग्रंथाचा, कागदपत्रांचा शोध घेऊन त्या आधारे तथ्यांचे संकलन करण्यात येईल.

2) "No document, No History" या सूत्राचा आधार घेऊन पाली भाषेतील त्रिपिटकांचा, ग्रंथाचा, कागदपत्रांचा याचा आधार घेऊन तथ्यांचे संकलन करण्यात येईल.

3) वाङ्मयीन साधने, पुरातत्त्वीय साधने, आणि मौखिक साधने यामध्ये समन्वय साधून नवीन मांडणी करण्यात येईल.

4) साधने व कागदपत्रांचे वर्गीकरण, विश्लेषण व पुर्नरावलोकन करुन तथ्यांची नव्याने पडताळणी करण्यात येईल.

केलेले कार्य हे आदर्श म्हणून समाजासमोर यावा शिवाय थोरांच्या चारित्र्यापासून मिळणारी शिकवण आणि प्रेरणा बहुमोल असते त्यामुळे इतिहास संशोधनास अत्यंत महत्त्व आहे.

महात्मा बुद्धांचा कालखंड जातिव्यवस्थेने समाजाला जखडून टाकलेला काळ होता. सर्व सामान्य मानवाला संभ्रमित करणारा प्रतिकुल परिस्थितीचा कालखंड होता. बुद्धांच्या पूर्वी वैदिक धर्म हा बोजड झाला होता. अनिष्ठ प्रथा, परंपरा, रुढी, जातिव्यवस्था, यज्ञविधी, कर्मकाड यांनी सर्व सामान्य माणूस हा पुर्णतः निराशावादी बनला होता. कर्मकांडात गुंतून पूर्णतः दिशाहिन झाला होता. अशा कालखंडात बुद्धाचा विचार, जीवनाचे सत्य, अष्टांग मार्ग, पंचशिल तत्त्व, त्यांचे उपदेश, तत्त्वज्ञान दु:ख संदर्भात उपाय योजना, जीवनाचा मार्ग हे सगळे विचार अंधकारमय स्थितीमध्ये चाचपडत असलेल्या सर्व सामान्य व्यक्तीला आपलासा वाटणारा बुद्धाचा धम्म म्हणून पुढे आलेला दिसतो.

बुद्धाचा विज्ञानवादी दृष्टीकोण यामुळे सर्व जन-माणसात बुद्धाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव हा वाढत गेला. सर्व दु:खाचे मुळ - तृष्णा होय आशा, अपेक्षा यांची पुर्तता न झाल्यास मानव निराश होतो. बुद्धाचा धम्म हा विज्ञानाशी विसंगत नाही. बौद्ध धर्म ग्रंथातील एखादे प्रतिपादन आधुनिक विज्ञानाशी विसंगत आढळून आल्यास बौद्ध म्हणून आपण ते अमान्य करण्यास मोकळे आहोत इतर धर्मियांना तशी मोकळीक नाही.

"कारण विशिष्ट, ग्रंथ, असे सांगतो म्हणून ते खरे आहे असे मानू नका" असे बुद्ध सांगतात. अंधश्रद्धा, रुढी, प्रथा, देव, कर्मकांड, यज्ञ विधी, आत्मा या संकल्पनेला मूठ - माती देण्याचे कार्य बुद्धांचा धम्म करेल असे दिसते या पृथ्वी तलावरील प्रत्येक व्यक्ती समान आहे. बुद्धाच्या धम्म विज्ञानवादाची कास धरुन भारत हा खऱ्या अर्थाने महासत्ता बनेल ही आशा बुद्धीझम मध्ये आढळुन येते. प्रत्येक मानवातील विज्ञानवाद हा जागृत करुन खऱ्या अर्थाने बुद्धाचे पाईक व्हावे हिच या संशोधनामागील भूमिका आहे.

ऐतिहासिक संशोधन पद्धती :-

ऐतिहासिक समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करताना तत्कालीन समाजातील आंतरहिताचे सूक्ष्म

अध्ययन करावे लागते. सामाजिक स्थित्यतंरे आणि धार्मिक संक्रमण तसेच आर्थिक परिस्थिती आर्वतातून इतिहास घडत असतो हे लक्षात घेऊन येथे. बुद्धकालीन इतिहासाचे नवे समाजशास्त्रीय लोक इतिहासाच्या दृष्टीने अध्ययन करावयाचे आहे.

अभ्यास कालावधी :-

हा अभ्यास अंशकालीन स्वरुपाचा आहे. स्वत: संशोधक इतिहासाचे अधिव्याख्याता आहेत. त्यामुळे हा अभ्यास तीन वर्षात पूर्ण करण्यात येईल.

तथ्य संकलनाची साधने :-

इतिहास हे साधनांच्या दयेवर चालणारे शास्त्र आहे. ऐतिहासिक साधने ही सूर्य व चंद्रासारखी पथ दर्शक असतात. त्याचा वापर करुन सत्यावर नवा प्रकाश टाकता येतो व सत्य नव्याने शोधता येते. या प्रबंधासाठी पुढील साधने वापरण्यात येतील.

1) प्राथमिक साधने :-

महात्मा गौतम बुद्धाच्या विचारातील संदर्भ आणि भूमिका या विषया संदर्भात मूळ अस्सल जातककथा, थेरी-गाथा, पाली, संस्कृत, मराठी भाषेतील अस्सल ग्रंथाचा, कागदपत्रांचा, अप्रकाशित लेखांचा, शोध निबंधाचा संदर्भ, आधार घेतला जाईल.

2) दुय्यम साधने :-

लेख, मौखिकसाधने, बौद्ध साहित्य, विविध वर्तमानपत्रातील लेख, शोधनिबंध विविध बुद्धासंदर्भातील लेखन इ. आढावा घेण्यात येईल.

प्रकरण- योजना

1) ऐतिहासिक पार्श्वभूमि

2) पूर्वचरित्र, गृहत्याग व द्विव्यज्ञानाची प्राप्ती

3) बुद्धाच्या विज्ञानवादाचा अर्थ व स्वरुप

4) बुद्धाचा धम्म व विज्ञानवादाशी संदर्भ

5) बुद्धांचे सिद्धांत

6) म. गौतम बुद्ध पहिला विज्ञानवादी विचारवंत व त्यांची पाईक परंपरा

7) उपसंहार

संदर्भ ग्रंथ सूची :-

1) आंबेडकर बी. आर - "भगवान बुद्ध ॲण्ड हिज धम्म" (अनुवाद) तळवटकर, चिटणिस, रेगे, सिद्धार्थ प्रकाशन, मुंबई 1970.

2) त्रिपिटक (पाली)

    1) विनय पिटक

    2) सुत्तपिटक

    3) अभिधम्मपिटक

    भदन्त तिस्स वंश सुगत प्रकाशन, नागपूर.

3) साळुंके आ.ह. - सर्वोत्तम भूमिपुत्र, गौतम बुद्ध, लोकायत प्रकाशन, सातारा 2007.

4) आपटे वा. गो.- बौद्धपर्व, समता प्रकाशन, नागपूर.

5) वऱ्हाडपांडे नी. र. - विवेकवाद, विजय प्रकाशन, नागपूर (पृष्ठ 272 ते 281).

6) कौसंबी डी. डी. - समाधी मार्ग, सुगत प्रकाशन, नागपूर.

7) मोरे मा. श. - महाराष्ट्रातील बौद्ध धर्माचा इतिहास, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, 2004.

8) जातक कथा - सौ. निर्मला पगारे (संपा.), सुगत प्रकाशन, नागपूर.

9) केतकर श्रीधर व्यंकटेश - "बुद्धोत्तर जग", प्रकाशन महाराष्ट्र ज्ञानकोश मंडळ, पुणे.

10) प्रसाद श्री - बुद्ध काव्यांजली, केंद्रीय शिक्षा संस्थान प्रकाशन, सारनाथ (हिंदी), 1996.

11) कीर धनंजय - धनंजय कीर यांचे अप्रकाशित लेख (संपा.) सुर्वे गजानन, पुणे.

12) डाहाट धनराज - धम्म सिद्धान्त, संकेत प्रकाशन, नागपूर.

13) काटदरे तांबे - प्राचीन भारत, के. सागर, पब्लिकेशन, पुणे, 2006.

14) खंदारे साहेबराव - जातककथा खंड - 1 व 2, प्रकाशन बुद्ध स्टडी सेंटर, परभणी.

15) सांस्कृतायन राहूल - दिघनिकाय (हिंदी) , काश्यप जगदीश परममित्र प्रकाशन, दिल्ली, 2002.

16) कदम कृ.अ. - गौतम बुद्ध चरित्र (संपादन), सौंदडकर सारनाथ (संपादक), सारनाथ प्रकाशन, परभणी.

17) खोब्रागडे एन.एल. - बौद्धकालिन भारत का इतिहास (हिंदी), समता प्रकाशन, नागपूर.

18) महाजन व्हि.डी. - प्राचीन भारत का इतिहास (हिंदी) एस.चंद्र, दिल्ली.

19) कौसाल्यान आनंद भदन्त - पाली वाङ्मय में बोधिसत्त्व सिद्धांत (हिंदी).

20) बी. आर. आंबेडकर - बुद्ध और उनके धम्म का भवितव्य (हिंदी) अनुवाद धम्मचारी विमलकीर्ती.

21) बारा पौर्णिमांचे महत्त्व - भदत्न आर. धम्मांकुर, थेरो संबोधि प्रकाशन, नागपूर.

22) बी. आर. आंबेडकर - बुद्ध मार्क्स व धम्माचे भवितव्य, सुगत प्रकाशन, नागपूर.

23) कश्यप जगदीश भिक्षु - मिलिंद - प्रश्न (हिंदी), सुगत प्रकाशन, नागपूर.

24) आंबेडकर बी.आर. - भारतातील जाती (अनुवाद) (गांजरे महेंद्र), अशोक प्रकाशन, नागपूर, पृष्ठ - 17.

25) कौसल्यायन आनंद भदन्त - यदि बाबा न होते (हिंदी), बुद्ध भुमि प्रकाशन, नागपूर, 1969.

26) कौशल्यायन आनंद - "An Intellgent mans guide to Buddhism", बुद्ध भुमी प्रकाशन, नागपूर, 1969.

27) तिस्सवंश भदन्त - विसुद्धि जग (पाली), सुगत प्रकाशन, नागपूर.

28) मून मिनाक्षी - फुले, आंबेडकरी चळवळ (संपादन), समता प्रकाशन, 2002.

29) मोरे मा.श. - बुद्ध धर्माचे मुळ सिद्धांत, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, 2006.

30) कौसंबी डी.डी. - बुद्धाचा उपदेश, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, 2001.

31) बी.आर. आंबेडकर (प्रदिप रोडगे) - बुद्ध और मार्क्स तुलना, नागपूर.

संशोधक विद्यार्थी

प्रा. बनसोडे पंढरी सोपानराव

श्री शिवाजी महाविद्यालय, उमरगा

जि. उस्मानाबाद

मार्गदर्शक

प्रा.डॉ. बलखंडे एस. पी.

इतिहास विभाग प्रमुख

कै. बाबुराव पाटील महाविद्यालय, हिंगोली